Pay U Money
Online/Net Banking
Debit Card/Credit Card

PAYTM Payment Accepted here
7588057695
9850203295

Pay

We request you to all the Education Department employees to submit our Youtube Educational Channel in the name of Vidyawarta. Through this channel, we are trying to provide information about educational Activity, teaching methods video, new rules about education sector. So you subscribe to this quality video channel and share it with other colleagues.

https://goo.gl/dk5tXx

YouTube Channel

IMPACT FACTOR

ISSN 2394-5303

Indexed

... By
... Ganpat
... 431 515
(Maharashtra) India
Cell : +91 75 88 05 76 95

Publisher & Owner
Archana Rajendra Ghodke
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) Mob.09850203295
E-mail: vidyawarta@gmail.com
www.vidyawarta.com

₹ 400/-

ISSN 2394-5303

Editor
Dr.Bapu G.Gholap

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

October 2021, Issue-81, Vol-04

Editor

Dr. Bapu g. Gholap

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

*Vidyawarta is peer reviewed research journal. The review committee & editorial board formed/appointed by Harshwardhan Publication scrutinizes the received research papers and articles. Then the recommended papers and articles are published. The editor or publisher doesn't claim that this is UGC CARE approved journal or recommended by any university. We publish this journal for creating awareness and aptitude regarding educational research and literary criticism.*

*The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. This Journal dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute, academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Editors and publishers have the right to convert all texts published in Vidyavarta (e.g. CD / DVD / Video / Audio / Edited book / Abstract Etc. and other formats).*

***If any judicial matter occurs, the jurisdiction is limited up to Beed (Maharashtra) court only.***









**Govt. of India,**
**Trade Marks Registry**
**Regd. No. 3418002**

**http://www.printingarea.blogspot.com**

116

13) ग्रामीण विकासाकरीता एकात्मिक बाल विकास सेवा योजना
डॉ. दिपाली श्रीराम घोगरे, पातूर जि. अकोला ||56

14) नेहरू रिपोर्ट : एक राजकीय दृष्टिक्षेप
डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव, केडगाव ||60

15) नव्वदोत्तरी ग्रामीण कवितेमधील पर्यावरणाचे चित्रण आणि वास्तव
डॉ. एन.व्ही. शिंदे, माढा ||62

16) पु. शि. रेगे यांच्याकाव्यातील प्रतिमासृष्टी
शोण बाबुराव तांगडे, डॉ. सुदर्शन. ई. दिवसे ||65

17) दलित साहित्य मानवतावादी समाज रचनेची निर्मिती
प्रा. डॉ. नामदेव बापूराव सोडगीर, चापोली ||67

18) विजया राजाध्यक्षांच्या कथांमधील स्त्रीवादी जाणिवेचे विश्लेषण
प्रा. डॉ. देवरे एस.एम., शिरपूर ||71

19) संत भगवान बाबांची शिकवण
प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे, सिंदखेड राजा, जि.बुलडाणा. ||73

20) विनोबा भावे यांचे भूदानविषयक विचार व कार्य
प्रा.डॉ.एन. जी.अडकिने, उमरी जि. नांदेड. ||76

21) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी पत्रकारितेचा इतिहास
प्रा. डॉ. अनिल माने, बिद्री ||78

22) डॉ. संजय ढोले यांच्या विज्ञानकथेतील जीवनमूल्ये
संतोष नानाभाऊ पाटील, प्रा.डॉ.माधव कौतिक कदम, नंदुरबार ||80

23) २१ व्या शतकात स्त्रि अस्तित्वाची जाणिव : एक विश्लेषणात्मक आढावा
डॉ. निलेश र. निंबाळकर, जळगांव (जा.) ||83

24) महात्मा फुले यांचे अखंड : एक चिंतन
प्रा. डॉ. शुभांगी परांजपे (डोरले),नागपूर ||88

25) नागपूर शहरातील शिक्षण महाविद्यालयातील इंग्रजी अध्यापन पद्धती....
डॉ. शिरीन शेख, नागपूर ||90

www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

म्हणतात की, "गाईचे शेण आणि मुत्र समारंभपूर्वक
त्याचे हा आनार (भर्ा) की अत्याचार". ते म्हणतात,
शेण खत आहे ते शेतात घाला, पोटात घालू नका"
अशा पध्दतीने समाजाला प्रबोधन करण्याचे काम
सावरकर करत असे.

चाफेकर फाशीवर गेले त्यावेळी सावरकर कमी वयाचे होते. या घटनेचा परिणाम सावरकरांवर प्रचंड पडला. यानंतर ते म्हणतात, मातश्भूमीच्या रक्षणासाठी मी शेवटपर्यंत लढत राहिल. टिळकांच्या जहाल तत्वज्ञानाचाही क्रांतीकारी विचारसरणीवर १९०० मध्ये त्यांनी मित्रमेळा नावाची संस्था काढली. पुढे तिचे रुपांतर १९०४ मध्ये अभिनव भारत या संस्थेत झाले. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारी शपथ अभिनव भारताच्या सभासदांना घ्यावी लागे. १९०५ च्या बंगालच्या फाळणीच्या वणव्यात मुफ्त पत्रके, सभा इत्यादी द्वारे प्रचार केला. परदेशी मालाच्या होळ्या केल्या. स्वदेशीचा पुरस्कार केला. नंतर ते इंग्लंडला गेले. मदनलाल धिंग्राने १९०२ मध्ये कर्झन वायलीला गोळी घालून ठार केले. अनंत कान्हेरेने १९०९ मध्ये जॅक्सनला ठार केले. दोघांना फाशी देण्यात आली.

अशा प्रकारे महाराष्ट्रात नव्हे तर पुर्ण भारतभर व परेदशात क्रांतीकारकांनी मोठे कार्य केले. शामजी कृष्णा वर्मा, सरदारसिंग राणा व मादाम कामा, लाला हरदयाळ इ. परदेशातही कार्य केले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1) Sudal P- – The Indian National Movement

2) Muzumdar R-C- (ED) – Struggle for Freedom

3) Verney Lovett – A History of the Indian National Movement

4) Sarkar Sumit – Modern India 1885 – 1947 1 Macmillion New Delhi

५ डॉ. पवार जयसिंगराव – हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६ सरकार सुमित – आधुनिक भारत, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, इलाहाबाद, पटना.

७ आधुनिक भारत – निराळी प्रकाशन, पुणे

13

# ग्रामीण विकासाकरीता एकात्मिक बाल विकास सेवा योजना

डॉ. दिपाली श्रीराम घोगरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. एच. एन. सिन्हा कला व वाणिज्य
महाविद्यालय, पातूर जि. अकोला

**********

**प्रस्तावना :**

माणसाच्या वाढीच्या आणि विकासाच्या वाटचालीतील अत्यंत महत्त्वाचा कालावधी ही त्याची बाल्यावस्था असते. बाल्यावस्थेत मुलांचा जो शारीरिक व माणसिक विकास होतो त्यावरच त्याचा भविष्यकालीन शारीरिक व माणसिक विकास अवलंबून असतो, आणि म्हणूनच बाळ जन्माला येण्यापूर्वी आणि जन्मल्यानंतर त्याला पुरेशा सेवा देण्याकरीता देशाने राष्ट्रीय धोरण तयार केले. त्या धोरणानुसारच २ ऑक्टोबर १९७५ साली मुलांना सर्वांगिण सेवा म्हणजेच आरोग्य, आहार व शिक्षण एकत्रितपणे देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने एकात्मिक बाल विकास सेवा योजना सुरवातीला प्रायोगिक तत्वावर सुरू केली. एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र–पुरस्कृत योजना असून या योजनेची सुरूवात अमरावती जिल्ह्यातील 'धारणी' या आदिवासी व 'धारावी, मुंबई' या नागरी प्रकल्पाच्या स्थापनेपासून महाराष्ट्रात झाली. टप्या–टप्याने या योजनेच्या प्रकल्पसंख्येत वाढ झाली. आज राज्याच्या तळागळापर्यंत पोहचलेला. राज्यभरात ६५ हजार केंद्र असणारा एकात्मिक बाल विकास सेवा योजना हा गरीब कुटुंबातील महिला व मुले यांच्यासाठीचा सर्वात मोठा कार्यक्रम आहे.

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्देश :**

१. ० ते ६ वयोगटातील मुलांचा पोषण व आरोग्य दर्जा सुधारणे.

२. मुलांच्या योग्य मानसिक, शारीरिक व सामाजिक विकासाचा पाया घालणे.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | October 2021 Issue-81, Vol-04 | 057

३. बालमृत्यूचे, बालरोगाचे, कुपोषणाचे व मध्येच शाळा सोडण्याचे प्रमाण कमी करणे.


४. बाल विकासाला चालना मिळावी म्हणून विविध विभागांमध्ये धोरण व अंमलबजावणी याबाबत परिणामकारक समन्वय साधणे.

५. योग्य पोषण व आरोग्यविषयक शिक्षणाद्वारे बालकांचे सर्वसामान्य आरोग्य, त्यांच्या पोषणविषयक गरजांकडे लक्ष पुरविण्याबाबत मातांची क्षमता वाढविणे.

**आंतरविभागीय समन्वय व सहाय्य :**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या यशस्वितेकरीता आरोग्य विभाग, ग्रामीण विकास विभाग, नगर विकास विभाग या सर्वांमध्ये संपर्क व समन्वय असणे अतिशय आवश्यक आहे. कारण या सर्व विभागाशी या योजनेचा संबंध येतो. ग्राम व तालुका स्तरावर अंगणवाडी सेविका, ए.एन.एम., पर्यवेक्षिका, शिक्षक, ग्रामसेवक, वैद्यकिय अधिकारी, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी, बालविकास प्रकल्प अधिकारी या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा ग्राम स्तरावरील विविध योजनांच्या अंमलबजावणीत तसेच त्यांच्या यशस्वितेत माठा वाटा असतो.


**सारणी क्र. २.१.१**




**स्त्रोत** : ग्रामविकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, राज्य कृती आराखडा, ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

**सारणी क्र. २.१.२**

**योजनेची प्रशासकीय रचना**




स्त्रोत : ग्रामविकासाची दिशा आणि पंचायत राज प्रशासन, राज्य कृती आराखडा, ग्रामीण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२

'या यंत्रणेमार्फत राबविणत येणाऱ्या योजनांचे सनियंत्रण ग्रामस्तर प्राथमिक आरोग्य केंद्र/ उपकेंद्र, प्रकल्प व जिल्हा या विविध स्तरांवर बौठका आयोजित करून करण्यात येतात. या बौठकांमधून योजनेच्या अंमलबजावणी व प्रगतीचा आढावा घेतला जातो.'[२]

**२.१.३ अंगणवाडी :**

'एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या' सर्व सेवा एकाच केंद्रातून दिल्या जातात, त्या केंद्राला 'अंगणवाडी' म्हणतात. ही 'अंगणवाडी' अंगणवाडी सेविका चालविते. अंगणवाडी सेविका ही गावात घरोघरी जाऊन तीथे ती बालके, विशेषतः स्त्रियांना पुरक पोषण आहार आणि आरेग्य विषयक माहिती देते आणि अंगणवाडी केंद्रात त्यांना मिळणाऱ्या सुविधांचा लाभ घ्यावा म्हणून प्रेरित करीत असते. गावात किंवा शहरात प्रति १००० लोकसंख्येमागे तर आदिवसी भागात ७०० लोकसंख्येमागे एक अंगणवाडी उघडली जाते.[३]

**२.१.४ एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा :**

या योजनेच्या माध्यमातून ० ते ६ वयोगटातील मुले, गरोदर स्त्रीया, स्तनदा माता व १५ ते ४५ वयोगटातील स्त्रियांना खालील सेवा पुरविल्या जातात.[४]

**सारणी क्र. २.१.३**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवा**

| ० ते ६ वयोगटातील | मुले गरोदर स्त्रिया स्तनदा माता | १५ ते ४५ वयोगटातील स्त्रिया |
|---|---|---|
| (१) लसीकरण | (१) लसीकरण | (१) आहार व आरोग्य शिक्षण |
| (२) आरोग्य तपासणी | (२) आरोग्य तपासणी | |
| (३) पूरक पोषण आहार | (३) पूरक पोषण आहार | |
| (४) संदर्भ सेवा | (४) आहार व आरोग्य शिक्षण | |
| ३ ते ६ वयोगटातील मुले | | |
| (५) अनौपचारिक शिक्षण | (५) संदर्भ सेवा | |

स्त्रोत : कुलश्रेष्ठ नीतिश, पंचायती राज एवं ग्रामीण विकास योजनाएँ, पृ. क्र. २१२, २१३

**१. लसीकरण** : ६ वर्षाखालील सर्व बालकांना बालरोगांपासून रक्षण करण्यासाठी डांग्या खोकला, घटसर्प,

होती."[११] "ऑक्टोबर २००९ च्या आलेखांतर्गत राज्यात ८२४१ अंगणवाड्या व ७२९६ मीनी अंगणवाड्या कार्यरत होत्या आणि ४७२ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते."[१२] "२०१०–११ मध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ९७४६२ अंगणवाड्या ११५६७ मीनी अंगणवाड्या आणि ५५२ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते."[१३] "२०११–१२ मध्ये महाराष्ट्रात एकूण ९७४६ अंगणवाडी १०९०१ मीनी अंगणवाडी आणि ५५३ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते."[८]

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत महाराष्ट्रातील पुरक व पोषण आहाराचे लाभार्थी व त्याच्यावर २००५–०६ ते २०११–१२ पर्यंत झालेला खर्च यांचा आढावा खालील सारणीमध्ये घेण्यात आला आहे.

**सारणी क्र. ३.१.१**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण भागातील पुरक व पोषण आहाराचे लाभार्थी व त्यांच्यावर झालेले खर्च (२००५–०६ ते २०११–१२), महाराष्ट्र राज्य**

| अ. क्र. | वर्ष | लाभार्थी संख्या (संख्या लाखात) | झालेला खर्च (रुपये कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २००५–०६ | ४५.७२ | २२३.९१ |
| २ | २००६–०७ | ५१.८१ | २३९.१३ |
| ३ | २००७–०८ | ५२.६१ | ३०५.४२ |
| ४ | २००८–०९ | ५४.३७ | २९८.५२ |
| ५ | २००९–१० | ५९.७१ | ४१८.०० |
| ६ | २०१०–११ | ६२.३९ | ५५८.०० |
| ७ | २०११–१२ | ६१.८२ | ८७४.०० |

स्रोत : Economic Survey of Maharashtra, 2005-06 to 2011-12

वरील सारणी क्र. ३.१.१ वरून असे दिसून येते की, महाराष्ट्रात सन २००५–०६ मध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा ४५.७२ लाख लाभार्थी लाभ घेत होते व त्यांच्यावर २२३.९१ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला. सन २००६–०७ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५१.८१ लाख होती आणि त्यांच्यावर २३९.१३ कोटी इतका खर्च करण्यात आला. २००७–०८ मध्ये लाभार्थी संख्या ५२.६१ लाख होती आणि त्यांच्यावर ३०५.४२ कोटी एवढा खर्च करण्यात आला. २००८–०९ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५४.३७ होती आणि त्यांच्यावर २९८.५२ कोटी रुपये खर्च करण्यात आला. २००९–१० मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५९.७१ लाख होती आणि त्यांच्यावर ४१८.०० कोटी रुपये खर्च करण्यात आले. २०१०–११ मध्ये लाभार्थ्यांनी संख्या ६२.३९ लाख होती आणि त्यांचयावर झालेला खर्च ५५८.०० कोटी इतका होता तर २०११–१२ मध्ये एकूण लाभार्थ्यांची संख्या ६१.८२ होती आणि त्यांच्यावर ८७४.३० कोटी एवढा खर्च करण्यात आला. एकंदर २००५–०६ पासून २०११–१२ पर्यंतचा विचार केला असता लाभार्थ्यांच्या संख्येत व झालेल्या खर्चात दरवर्षी वाढ झालेली दिसून येते.

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयांतर्गत असलेल्या महिला व बालविकास विभागाकडून देशभरात एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जाते. कुपोषणाला प्रतिबंध घालणे तसेच सर्वांना चांगले आरोग्य व पोषण प्राप्त करून देणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्रात ही योजना महिला व बाल विकास विभागाकडून राबविली जाते. आरोग्य, तपासणी, लसीकरण, आरोग्य व सकस आहार विषयक शिक्षण, पूरक व पोषण आहार, संदर्भ आरोग्य सेवा आणि अनौपचारीक शालेयपूर्व शिक्षण या सहा उपक्रमांच्या माध्यमातून एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जाते. ह्या सर्व सेवा अंगणवाडीच्या माध्यमातून दिल्या जातात. सदर योजनेत आहार, आरोग्य व शिक्षण या सेवा एकत्रीतपणे दिल्या जातात. विशेष म्हणजे या योजनेत स्त्रिया व मुले यासारख्या जोखमीच्या तसेच दूर्लक्षीत असलेल्या घटकांना प्राधान्य दिले जाते. त्यांना दिल्या जाणाऱ्या पूरक व पोषण आहारामुळे त्यांची दैनंदिन उष्मांक व प्रथिनांची गरज भागते. अंगणवाडीत कुपोषित बालकांवर संदर्भसेवेद्वारे औषधोपचार होऊन त्यांच्या श्रेणी सुधारणेत मदत होते. परिणामतः मुलांमधील कुपोषण आणि बालमृत्यु यामध्ये लक्षणीय घट झालेली दिसून आलेली आहे. अंगणवाडी कार्यरत असलेल्या गावात नियमित लसीकरण होत असल्याने मुलांच्या गळतीचे प्रमाणही कमी झालेले दिसून येते. आरोग्य व आहारविषयक प्रशिक्षणामुळे महिलांचे व बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे.

ISSN: 2394 5303 | Impact Factor 7.891(IIJIF) | Printing Area® Peer-Reviewed International Journal | October 2021 Issue-81, Vol-04 | 059

होते.''११ "नोव्हेंबर २००९ च्या [illegible] राज्यात ८८२४२ अंगणवाड्या व ७२९६ मीनी अंगणवाड्या कार्यरत होत्या आणि ४७२ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते.''१२ "२०१०–११ मध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ९७४६२ अंगणवाड्या ११५६७ मीनी अंगणवाड्या आणि ५५२ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते.''१३ "२०११–१२ मध्ये महाराष्ट्रात एकूण ९७४६ अंगणवाडी १०९०१ मीनी अंगणवाडी आणि ५५३ बाल विकास प्रकल्प कार्यरत होते.''८

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत महाराष्ट्रातील पुरक व पोषण आहाराचे लाभार्थी व त्याच्यावर २००५–०६ ते २०११–१२ पर्यंत झालेला खर्च यांचा आढावा खालील सारणीमध्ये घेण्यात आला आहे.

**सारणी क्र. ३.१.१**

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ग्रामीण भागातील पुरक व पोषण आहाराचे लाभार्थी व त्यांच्यावर झालेले खर्च (२००५–०६ ते २०११–१२), महाराष्ट्र राज्य**

| अ. क्र. | वर्ष | लाभार्थी संख्या (संख्या लाखात) | झालेला खर्च (रुपये कोटी) |
|---|---|---|---|
| १ | २००५–०६ | ४५.७२ | २२३.९१ |
| २ | २००६–०७ | ५१.८१ | २३९.१३ |
| ३ | २००७–०८ | ५२.६१ | ३०५.४२ |
| ४ | २००८–०९ | ५४.३७ | २९८.५२ |
| ५ | २००९–१० | ५९.७१ | ४१८.०० |
| ६ | २०१०–११ | ६२.३९ | ५५८.०० |
| ७ | २०११–१२ | ६१.८२ | ८७४.०० |

स्त्रोत : Economic Survey of Maharashtra, 2005-06 to 2011-12

वरील सारणी क्र. ३.१.१ वरून असे दिसून येते की, महाराष्ट्रात सन २००५–०६ मध्ये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचा ४५.७२ लाख लाभार्थी लाभ घेत होते व त्यांच्यावर २२३.९१ कोटी एवढा निधी खर्च करण्यात आला. सन २००६–०७ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५१.८१ लाख होती आणि त्यांच्यावर २३९.१३ कोटी इतका खर्च करण्यात आला. २००७–०८ मध्ये लाभार्थी संख्या ५२.६१ लाख होती आणि त्यांच्यावर ३०५.४२ कोटी एवढा खर्च करण्यात आला. २००८–०९ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५४.३७ होती आणि त्यांच्यावर २९८.५२ कोटी रुपये खर्च करण्यात आला. २००९–१० मध्ये लाभार्थ्यांची संख्या ५९.७१ लाख होती आणि त्यांच्यावर ४१८.०० कोटी रुपये खर्च करण्यात आले. २०१०–११ मध्ये लाभार्थ्यांची संख्या ६२.३९ लाख होती आणि त्यांच्यावर झालेला खर्च ५५८.०० कोटी इतका होता तर २०११–१२ मध्ये एकूण लाभार्थ्यांची संख्या ६१.८२ होती आणि त्यांच्यावर ८७४.३० कोटी एवढा खर्च करण्यात आला. एकंदर २००५–०६ पासून २०११–१२ पर्यंतचा विचार केला असता लाभार्थ्यांच्या संख्येत व झालेल्या खर्चात दरवर्षी वाढ झालेली दिसून येते.

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयांतर्गत असलेल्या महिला व बालविकास विभागाकडून देशभरात एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जाते. कुपोषणाला प्रतिबंध घालणे तसेच सर्वांना चांगले आरोग्य व पोषण प्राप्त करून देणे हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्रात ही योजना महिला व बाल विकास विभागाकडून राबविली जाते. आरोग्य, तपासणी, लसीकरण, आरोग्य व सकस आहार विषयक शिक्षण, पूरक व पोषण आहार, संदर्भ आरोग्य सेवा आणि अनौपचारीक शालेयपूर्व शिक्षण या सहा उपक्रमांच्या माध्यमातून एकात्मिक बाल विकास सेवा योजना राबविली जाते. ह्या सर्व सेवा अंगणवाडीच्या माध्यमातून दिल्या जातात. सदर योजनेत आहार, आरोग्य व शिक्षण या सेवा एकत्रीतपणे दिल्या जातात. विशेष म्हणजे या योजनेत स्त्रिया व मुले यासारख्या जोखमीच्या तसेच दूर्लक्षीत असलेल्या घटकांना प्राधान्य दिले जाते. त्यांना दिल्या जाणाऱ्या पूरक व पोषण आहारामुळे त्यांची दैनंदिन उष्मांक व प्रथिनांची गरज भागते. अंगणवाडीत कुपोषित बालकांवर संदर्भसेवेद्वारे औषधोपचार होऊन त्यांच्या श्रेणी सुधारणेत मदत होते. परिणामत: मुलांमधील कुपोषण आणि बालमृत्यु यामध्ये लक्षणीय घट झालेली दिसून आलेली आहे. अंगणवाडी कार्यरत असलेल्या गावात नियमित लसीकरण होत असल्याने मुलांच्या गळतीचे प्रमाणही कमी झालेले दिसून येते. आरोग्य व आहारविषयक प्रशिक्षणामुळे महिलांचे व बालकांचे आरोग्य सुधारण्यास मदत होत आहे.